कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/रा.भ.स्प/२०२३-२४/१०४०
दि.१६/०८/२०२३

## कृपया प्रसिध्दीसाठी

संस्कारक्षम समाजाची निर्मिती होण्यासाठी व समाज मनावर सुसंस्कारित विचारांचे संस्कार होण्यासाठी भजन स्पर्धेसारख्या उपक्रमाचे आयोजन होणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन गोवा राज्याचे मा. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यानी कला अकादमीच्या पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती राज्यस्तरीय भजन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहूणे म्हणून बोलताना केले. पुढे बोलताना मा. मुख्यमंत्री म्हणाले युवा-वर्ग मोठया प्रमाणात भजनाकडे आकर्षित होताना दिसत असून हे उज्वल भविष्याचं लक्षण असल्याचे ते म्हणाले तसेच भजनात तल्लीन होऊन राहिल्यास एकाग्रता वाढविण्यात मदत होते त्यामुळे आजच्या धकाधकीच्या जीवनात आपले शरीरही निरोगी राहते असेही मा. मुख्यमंत्र्यानी याक्षणी बोलून दाखविले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा. कला व संस्कृती मंत्री तसेच कला अकादमीचे अध्यक्ष श्री. गोविंद गावडे उपस्थित होते. त्यानीही आपल्या भाषणात कला अकादमीच्या भजन स्पर्धेत नाविन्यपूर्ण बदल करण्याच्या विचारात असल्याचे सागीतले व त्यासाठी भजनप्रेमी रसिकानी व जाणकारांनी तशा प्रकारच्या सुचना लिखित स्वरुपात करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

प्रारंभी कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. विनेश आर्लेकर यांनी प्रस्ताविक करुन उपस्थितांचे व मान्यवरांचे स्वागत केले तर कार्यक्रम अधिकारी श्री. प्रशांत नागेशकर यांनी ऋणनिर्देश केला. संपूर्ण स्पर्धेचे व पारितोषिक वितरण समारंभाचे निवेदन कला अकादमीचे कार्यक्रम व विकास अधिकारी श्री. प्रदीप गांवकर यानी केले. यावेळी व्यासपीठावर रविंद्र भवनचे उपाध्यक्ष श्री. विठोबा घाडी, राज्यस्तरीय पुरुष भजन स्पर्धेचे परिक्षक श्री. गणेश पार्सेकर, श्री. सुर्या शेटये व आनंद सालेलकर उपस्थित होते.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी